| स्थापना : १९६८ | 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'- कर्मवीर | प्राचार्य<br>डॉ. एल. डी. कदम<br>M.Sc.,Ph.D. |
|---|---|---|
| संस्थापक : डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील डी.लिट. | **आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)**<br>ता.पलूस, जि. सांगली ४१६३०८<br>(महाराष्ट्र) | एस.टी.डी कोड : (०२३४६)<br>कार्यालय : २२२०३५<br>निवास : २२२००९<br>फॅक्स : २२२०३५ |
| | *नॅक मानांकन : 'ए'* | **E-mail** : ascc_rnagar@ymail.com. |

जावक क्र. 746/2019-2020 दिनांक : 15 आक्टोंब 2019


**प्रति,**
**सचिव,**
उच्च शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

**विषय :** ३३ कोटी वृक्षरोपण कार्यक्रम अंमलबजावणी...

**संदर्भ :** दिनांक २२/०७/२०१९ चे पत्र क्रमांक: कक्ष-१/रोहयो/प्रक्र.२०/६६८/१९-२० आणि
दिनांक ०९/०८/२०१९ चे पत्र क्रमांक : रासेयो-२०१९/प्र/क्र.९१/साशि-७

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या पत्रानुसार आमच्या महाविद्यालयामध्ये दिनांक २५ जुलै २०१९ रोजी महाविद्यालयाच्या आवारात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक व शिक्षकवृंदाकडून वृक्षलागवड करून आपल्या सूचनेची अंमलबजावणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना सार्वजनीक ठिकाणी, घराशेजारी वृक्षलागवड करून त्याची जोपासना करण्याविषयक शपथ देण्यात आली. तसेच महाविद्यालयातील ५० एन.एस.एस. स्वयंसेवकांना **'एक घर एक झाड'** या अंतर्गत आपल्या घराशेजारी, शेतामधील बांधावर वृक्षलागवड करण्यासाठी जांभुळ, आंबा, सोनचाफा, बदाम, रेनट्री यासारख्या रोपांचे वाटप करण्यात आले.

**विद्यापीठाचे नाव : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | वृक्षलागवडीची जागा | वृक्षलागवडीची संख्या | सहभागी रासेयो स्वयंसेवकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस, जि. सांगली. पीन. ३१६३०८ (महाराष्ट्र) | महाविद्यालयाचा परिसर, आवार आणि विद्यार्थ्यांच्या घराशेजारी व शेताच्या बांधावर. | 75 | 50 |

प्राचार्य
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

सोबत : १. वृक्षलागवड कार्यक्रमाचे जीओ टॅग फोटो.
२. सकाळ वृत्तपत्रातील बातमी

- महाविद्यालय परिसरात वृक्षारोपन करताना विद्यार्थी















❑ वृक्षलागवड कार्यक्रमाची सकाळ वृत्तपत्रातील बातमी

सकाळ सांगली, बुधवार, ३१ जुलै २०१९ ५

# रामानंदनगर कॉलेजमध्ये वृक्षारोपण



रामानंदनगर : पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण झाले.

किर्लोस्करवाडी, ता. ३० : रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात एन. सी. सी., एन. एस. एस. आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण झाले. विद्यालय, सार्वजनिक ठिकाणी, घरांशेजारी वृक्षांची लागवड करण्याची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली.

प्राचार्य. डॉ. एल. डी. कदम म्हणाले,"शहरांबरोबरच खेड्यांतही सिमेंटचे जंगल वाढत आहे. निसर्गाच्या झपाट्याने होत असलेल्या हानीमुळे तापमानात वाढ झाली आहे. औद्योगिकीकरणामुळे रस्त्यांचे जाळे विस्तारले असले तरी रस्त्यालगत वृक्षांची वाणवा आहे. दुसरीकडे वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे कार्बनडॉक्साइडचाही परिणाम जैवसृष्टीवर झाला आहे. तापमान रोखण्यासाठी वृक्षलागवड करून वातावरणातील समतोल राखणे गरजेचे आहे.

शासनाकडूनही विविध उपक्रम राबवण्यात येतात. आपणच विद्यार्थ्यांनी घराभोवती, शेतात वृक्ष लागवड करून निगा राखण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे."

महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पन्नास विद्यार्थ्यांना जतनासाठी जांभूळ, आंबा, सोनचाफा, रेन ट्री, बदाम रोपांचे वाटप करण्यात आले.

उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. काकासाहेब भोसले, पर्यवेक्षक प्रा. संजय पाटील, कार्यालयीन अधीक्षक सुहास सौंदाडे, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.